-: श्री गजानन प्रसन्न :-

# बक्षिसपत्र

बक्षीस पत्र आज दि. ०५, माहे जुलै, इ.स.वी. २०१३, वार शुक्रवार ते दिवशी.....

| | | |
|---|---|---|
| **कै. दिनकरराव जेधे पाटील प्रतिष्ठान, संचलित** | ) | |
| **प्रिती इंग्लिश मेडीयम स्कुल,** | ) | |
| **पत्ता –** गट नं. २७२/१/७, बोऱ्हाडेवाडी, मोशी, | ) | |
| ता. हवेली, जि. पुणे - ४१२१०५ | ) | |
| पॅन नं.- | ) | |
| **तर्फे सेक्रेटरी –** | ) | **बक्षिसपत्र** |
| **सौ. संगिता विठ्ठल मिसाळ** | ) | **लिहून घेणार** |
| वय - ३८ वर्षे, धंदा - नोकरी, | ) | |
| रा.- स.नं. १९८, राधाकृष्णनगर, कॉलनी नं. १, | ) | |
| भोसरी, पुणे - ४११०३९ | ) | |

**यांसी ...**

| | | |
|---|---|---|
| **श्री. विठ्ठल गणपत मिसाळ** | ) | |
| वय - ४९ वर्षे, धंदा - नोकरी, | ) | **बक्षिसपत्र** |
| पॅन नं.- BCIPM6129B | ) | **लिहून देणार** |
| रा.- स.नं. १९८, राधाकृष्णनगर, कॉलनी नं. १, | ) | |
| भोसरी, पुणे - ४११०३९ | ) | |

कारणे बक्षीसपत्र लिहून देतो, ते येणेप्रमाणे :-

१) मिळकतीचे वर्णन :- तुकडी पुणे, पोट तुकडी तालुका हवेली, मे. सब रजिस्ट्रारसाहेब हवेली, पुणे यांचे कार्यक्षेत्रातील व पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील गांव **मौजे बोऱ्हाडेवाडी** येथील जुना गट. नं. १३९० गट नं. २७२/१/७, यांसी एकूण क्षेत्र ०१ हे. ४० आर, यामधील लिहून देणार यांच्या हिश्श्याचे व मालकीचे व सदर बक्षिसपत्राचा विषय असलेले क्षेत्र ०० हे. ४० आर, यांसी चतु:सिमा -

| | | |
|---|---|---|
| पुर्वेस | - | रस्ता |
| पश्चिमेस | - | रस्ता |
| दक्षिणेस | - | गायकवाड यांची मिळकत |
| उत्तरेस | - | गायकवाड यांची मिळकत |

येणेप्रमाणे चतु:सिमापुर्वक मिळकत. त्यातील झाड, झाडोरा, पाला पाचोळा, इत्यादी तदंगभुत वस्तूसहीत, इतर सर्व अस्तित्वात असलेले वास्तुसह, वागणुकीचे, वहिवाटीचे, जाण्यायेण्याचे, इजमेंटचे हक्कादरोबस्त व येथुन पुढे प्रस्तुतच्या दस्तात सदर मिळकत म्हणून उल्लेख केलेला आहे.

२) वर कलम १ यांत वर्णन केलेली मिळकत ही लिहून देणार यांचे स्वकष्टार्जित खरेदी मालकी वहिवाटीची मिळकत असून सदर मिळकत लिहून देणार यांनी श्री. महादू नाना गायकवाड -- यांचेकडुन दि. -२५ मार्च १९९७-- रोजी नोंदणीकृत खरेदीखता द्वारे खरेदी केलेली आहे. सदरचे खरेदीखत सह दुय्यम निबंधक हवेली क्र. -९-- यांचे दप्तरी दस्त क्र. २०३-/१९९५--- नुसार नोंदविलेला आहे. तेव्हापासून सदर मिळकत लिहून देणार यांचे ताबेवहिवाटीची असून तशी सरकारी निमसरकारी दप्तरी तसेच ७/१२ उताऱ्यास फेरफार क्र. २२४७--- नुसार नोंद झालेली आहे. तेव्हापासून सदर संपुर्ण मिळकत ही मालकी हक्काने वहिवाटीस हक्क व अधिकार प्राप्त झालेला असून त्यांना सदर मिळकतीची विल्हेवाट लावण्याचा पुर्ण हक्क व अधिकार आहे.

३) सदर मिळकत ही निर्वेध व निजोखमी असून तीमध्ये लिहून देणार सोडून इतर कोणाचेही कसल्याही प्रकारचे हक्क, हितसंबंध वा अधिकार नसून, तीची विक्री वा विल्हेवाट लावण्याचे सर्व हक्क व अधिकार लिहून देणार यांनाच आहे.

४) सदर मिळकत ही लिहून देणार यांची स्वकष्टार्जित मिळकत असून लिहून घेणार ही एक शैक्षणिक संस्था असून ती लिहून देणार यांनी शैक्षणिक व सामाजिक भावनेतुन सदरची मिळकत लिहून

घेणार यांना या बक्षिसपत्राने बक्षिस देत आहेत. त्यामध्ये यापुढे लिहून देणार यांचा कोणताही हक्क व अधिकार राहणार नाही.

**सदरचे बक्षीसपत्र हे कोणताही मोबदला न स्विकारता स्वइच्छेने लिहून देणार हे देत आहेत. लिहून घेणार ही एक शैक्षणिक संस्था असून लिहून देणार यांना शिक्षणाची व समाज सेवेची आवड असल्यामुळे या भावनेतुर सदरची मिळकत लिहून घेणार यांना सदरचे बक्षिसपत्राद्वारे लिहून दिलेले आहे.**

५) सदरचे मिळकत बक्षिस देणे संबंधीचा प्रस्ताव लिहून देणार यांनी लिहून घेणार यांना ठेवला असता सदरचा प्रस्तावाची लिहून घेणार यांनी स्विकृती केली. तसेच लिहून देणार यांनी घातलेल्या अटी व शर्ती लिहून घेणार यांनी मान्य करुन सदरची मिळकत लिहून देणार यांनी सांगितलेल्या हेतु करीता लिहून घेणार हे वापरतील.

६) लिहून घेणार हे सदरची मिळकत किंवा त्यामधील भाग कधीही कोणासही हस्तांतरीत करणार नाही, किंवा सदरच्या मिळकतीवर गहाण, दान, लिज, बोजा, कर्ज निर्माण करणार नाहीत किंवा त्या संबंधी कोणताही व्यवहार त्रयस्थ इसमाशी करणार नाहीत.

७) वर कलम १ यांत वर्णन केलेल्या मिळकतीचे लिहून देणार हे मालक असून त्यांनी मालकीहक्काबद्दल व वहिवाटी बद्दल खात्री दिलेली आहे. सदरची मिळकत ही निर्वेध व निजोखमी असून, त्यांनी क्लिअर मार्केटेबल टायटलची खात्री आम्हास दिलेली आहे. याउपर सदर मिळकतीवर सदर मिळकतीवर कोणाचाही कसलाही मालकी हक्क, गहाण, दान बक्षीस, लिज, अन्न वस्त्र, इत्यादी कोणताही कसलाही बोजा असल्याचे आढळून आल्यास, त्याचे निराकरण लिहून देणार हे पदरखर्चाने करुन देतील.

८) सदर मिळकतीचे आजपर्यंतचे सर्व शासकिय निमशासकिय व नगरपालिकेचे कर, सेस, टॅक्सेस, शेतसारा इत्यादी लिहून देणार यांनी दिलेले असून, यापुढील सर्व कर, टॅक्सेस इत्यादी लिहून घेणार यांनी मालकी हक्काने भरावयाचे आहे. सदरच्या देय रकमेपैकी मागील काही बाकी आढळून आल्यास, त्याचे निराकरण लिहून देणार हे करुन देतील.

९) सदर मिळकतीचा खुला व प्रत्यक्ष ताबा आज रोजी प्रत्यक्ष मिळकतीत जावून, लिहून देणार यांनी लिहून घेणार यांना दिलेला असून, लिहून घेणार यांनी तो घेतलेला आहे.

१०) सदर मिळकतीस आता लिहून घेणार यांनी प्रॉपर्टी कार्डाच्या उताऱ्यास, सिटी सर्वेच्या उताऱ्यास, ७/१२ उताऱ्यास, महावितरण विज बिलावर नाव लावणेकामी व त्याचप्रमाणे पिंपरी - चिंचवड महानगरपालिकेच्या रेकॉर्डला तसेच अन्य शासकिय, निमशासकिय रेकॉर्डला मालकी हक्काने वहिवाटीस लावून घ्यावे. त्यासाठी लिहून देणार यांची सही संमतीची, जाब जबाबाची जरुरी भासल्यास ते सर्व लिहून देणार हे विनामोबदला देऊ. त्यात हयगय करणार नाही.

११) आत्ता सदर मिळकतीचे या बक्षीसपत्राने लिहून घेणार हे मालक झाले असून, सदरची मिळकत वंशपरंपरा, पुत्रपौत्रादि मालकी हक्काने वहिवाटीची किंवा तिची वरील अटीस बांधील राहुन उपभोग घ्यावयाचा आहे.

१२) प्रस्तुतचे बक्षीसपत्र हे आम्ही, आमचे वालीवारस, साव सावकार यांचेवर बंधनकारक आहे व राहील.

१३) प्रस्तुतचे बक्षीसपत्र आम्ही तुम्हांस तुमचेकडून कोणताही मोबदला न घेता लिहून दिलेले आहे.

येणेप्रमाणे बक्षीसपत्र राजीखुशीने, अक्कलहुशारीने, नशापाणी न करता, स्वखुशीने, स्वसंतोषाने, समजून उमजून, वाचुन घेऊन, कोणाच्याही दडपणास बळी न पडता लिहून दिले असे व तुम्ही या बक्षीसपत्राने आम्ही दिलेले बक्षीस स्विकारलेले आहे व त्याचे साक्षीसाठी लिहून देणार व लिहून घेणार यांनी साक्षीदारासमक्ष आपआपल्या सह्या या बक्षीसपत्रावर केल्या असून साक्षीदारांनी त्यांच्या सह्या केलेल्या आहे.

श्री. विठ्ठल गणपत मिसाळ
लिहून देणार

कै. दिनकरराव जेधे पाटील प्रतिष्ठान, संचलित
– प्रिती इंग्लिश मेडीयम स्कुल, तर्फे सेक्रेटरी –
सौ. संगिता विठ्ठल मिसाळ
लिहून घेणार

साक्षीदार :-

१) सही :-

नांव :-

पत्ता :-

२) सही :-

नांव :-

पत्ता :-